पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
माजंस/२ /कावि/१ /२०२०
दि. ०१/०१/२०२०

परिपत्रक

**विषय:- जाहिरात सेलच्या स्थापनेबाबत...**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील निविदा सुचना, राबविण्यात येणारे उपक्रम व विविध योजना, जाहीर नोटीस इ. च्या जाहिराती वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात येतात. सदर जाहिरातींसाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत संबंधित विभागांना मागणीनुसार जाहिरात रोटेशन देण्यात येते. त्यानुसार संबधित विभागामार्फत वृत्तपत्रांना प्रसिद्धी आदेश देण्यात येतो. तदनंतर संबधित विभागामार्फत वृत्तपत्रांची जाहिरात बिल अदायगी करण्यात येते. यामुळे जाहिरात बिले प्रलंबित राहण्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी जाहिरात प्रसिद्धी व बिल अदायगीमध्ये सुसूत्रता येणेकामी माहिती व जनसंपर्क विभागा अंतर्गत जाहिरात सेल ची स्थापना करण्यात येत आहे. दि. ०१ जानेवारी २०२० पासून सदर जाहिरात सेल मार्फत विविध विभागांकडील निविदा सुचना, राबविण्यात येणारे उपक्रम व विविध योजना, जाहीर नोटीस इ. बाबत वृत्तपत्रांना मनपा रोटेशननुसार देण्यात येणा-या जाहिरातींचे प्रसिद्धी आदेश देणे व प्राप्त जाहिरात बिलांची अदायगी करण्यात येईल.

तरी याकामी सर्व विभागांनी पुढील प्रक्रियेचा अवलंब करावा.

१) दि. ०१ जानेवारी २०२० पासून सर्व विभागांनी त्यांचेकडील प्रसिद्ध करावयाचा जाहिरात मसुदा मान्य प्रस्तावासह माहिती व जनसंपर्क विभागाकडे जाहिरात प्रसिद्धी दिनांकाच्या किमान ३ दिवस अगोदर सादर करावा.

२) तसेच जाहिरात प्रसिद्धीचा मसुदा सॉफ्ट कॉपीमध्ये माहिती व जनसंपर्क विभागाकडील pro@pcmcindia.gov.in या ई-मेल आयडी वर पाठवण्यात यावा.

३) प्रसिद्ध करावयाच्या जाहिरात मसुद्यामध्ये निविदा/योजनेचा कालावधी स्पष्टपणे नमूद करावा.

४) दि. ३१ डिसेंबर २०१९ अखेर प्रसिद्धीस देण्यात आलेल्या जाहिरात बिलांची बिल अदायगी संबधित विभागांमार्फतच करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी दि. ०१ जानेवारी २०२० पासून करण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रती:-
सर्व विभागप्रमुख

Scanned by CamScanner